# <u>प्रेसनोट</u>

दिनांक:- ०८/०८/२०१९

## ''अंमलीपदार्थ (गांजा) विक्री करणाऱ्या आरोपींना नवी मुंबई गुन्हे शाखा, कक्ष-२, पनवेल येथील पोलीसांनी केले जेरबंद''

---

**(१) मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या गुन्हेगारांविरोधात विशेष मोहीम राबविण्याबाबत आदेशीत केले आहे.**

मा. पोलीस आयुक्त श्री. संजय कुमार, नवी मुंबई, पोलीस उप आयुक्त श्री. प्रविणकुमार पाटील, गुन्हे शाखा, सहा. पोलीस आयुक्त श्री. अजय कदम, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे मागर्दर्शनाखाली नवी मुंबई आयुक्तालयाचे हददीत अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या इसमांविरोधात कारवाई करण्याची विशेष मोहीम चालु असतांना दि.०१/०८/२०१९ रोजी गुन्हे शाखा, कक्ष २ पनवेल येथील नेमणुकीतील पोना/२३३४ प्रफुल मोरे यांना कामोठे पोलीस ठाण्याच्या हददीत मोठा खांदागाव स्मशानभूमी जवळील परिसरात एक महीला गांजा विक्री करीत असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने गुन्हेशाखा, कक्ष-२, पनवेलचे वपोनि. श्री के.आर. पोपेरे, यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे कक्ष-२, पनवेल व अंमलीपदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा या कक्षांकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा लावुन शिताफीने गांजा विक्री करणारी महीला नामे शिल्पा विशाल खेडकर, वय ३५, रा. से १, चांमुडा हिलक्रिस्ट, रुम नं. ३०४, कंरजाडे, ता. पनवेल, जि. रायगड हिस ताब्यात घेवून तिच्याकडे सखोल चौकशी करता, तिने व तिचे साथीदार १) विठ्ठल पांडुरंग बांगर, वय ५०, रा. आदई, ता. पनवेल, २) भागवत ज्ञानदेव खेडकर, वय २८, रा. कंरजाडे ता. पनवेल ३) संतोष मधुकर शिंदे. वय ३४, रा. आदई, ता पनवेल यांच्या मदतीने मोठा खांदा गांव ता. पनवेल येथील स्मशानभुमीजवळ असलेल्या कंटनेरच्या डब्यामध्ये व कंरजाडे येथे आरोपीत यांचे निवासस्थानी व टेम्पो क्रं. एमएच ४६ बीएफ ८१४१ मध्ये तसेच आजुबाजुला शोध घेवुन सुमारे २४ किलो ५५० ग्रॅम वजनाचा अंदाजे २,४५,०००/- रु किमंतीचा गांजा व सदर गुन्हयाकरीता वापरण्यात आलेला बोलेरो पिकपअप टेम्पो असा एकुण ७,८४,६१०/- रु किंमतीचा माल बेकादेशीररित्या ताबेकब्जात बाळगले स्थितीत मिळुन आल्याने नमुद आरोपींचे विरुद्ध कामोठे पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. १३५/१९ गुगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ (एनडीपीएस) अधिनियम १९८५ चे कलम ८(क) २०, २९, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/गणेश कराड करीत आहेत. नमुद अटक आरोपीत यांची दि. १३/०८/२०१९ पर्यंत पोलीस कोठडी रिंमाड मिळाली असून गुन्हयाचा तपास चालु आहे.

**(२) त्याचप्रमाणे पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं ३०४/१९ भादवि कलम ३६३** हा दाखल असून सदर गुन्हयातील अपहृत मुलगी ही अनाथ असून ती नेरे, वांगणी ता. पनवेल जि रायगड येथील शीला आश्रम मधील आहे. सदर अपहृत मुलीबाबत वपोनि श्री. पोपेरे यांना मिळालेल्या माहीती वरुन ती के.व्ही. कन्या शाळा, पनवेल येथून मिर्सीग झाली असल्याने तसेच ती १६ वर्ष वयाची असल्याने तिला समाज कंटकापासुन धोका होवु नये, याकरीता सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून वपोनि श्री. पोपेरे यांनी गुन्हे शाखा, कक्ष २, कडील सपोनि शरद ढोले, पोहवा/साळंके, पोना/परेश म्हात्रे, पोशि/भोपी यांनी सदर परीसरात गस्त घालून तपासादरम्यान अपहृत मुलगी ही तिच्या ओळखीची महीला नामे सौ. समुद्रीता उर्फ सोना गोपाळ शहा वय २५, रा विहीघर ता. पनवेल जि. रायगड येथे राहत असल्याची गोपनीय बातमीदारामार्फत माहीती मिळाल्याने सदर ठिकाणी तात्काळ जावून पिडीत मुलगी यशोदा हिस सुखरुप ताब्यात घेवून तिची सखोल चौकशी केली असता, तिला शिला आश्रमात कंटाळा आल्याने स्वत:हून आपले मर्जीने तेथे राहत असल्याचे सांगितले असून सदर अपृहत पिडीत मुलगी हिस पनवेल शहर पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

**(३) तसेच पनवेल तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १३२/१९ भादवि कलम ३०७ सह भारतीय हत्यारकायदा कलम ३, २५ सह महाराष्ट पोलीस कायदा कलम ३७(१) १३५ प्रमाणे दि. ३१/०७/२०१९ रोजी दाखल आहे. सदर गुन्हयातील फिर्यादी श्री. अनिल सचदेवा, वय ५५ वर्षे यांचेवर दिनांक २९/०७/२०१९ रोजी सायंकाळी ०६: १५ वा. चे सुमारास सोमाटणे ते गिरवले या गावामधुन जाणाऱ्या रस्त्यावर कोणीतरी अज्ञात इसमाने अग्निशस्त्राने गोळीबार**

**करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत माहीती मिळाल्याने वरिष्ठांच्या आदेशाने वपोनि श्री. पोपेरे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखुन गुन्हे शाखा, कक्ष २ पनवेल येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सदर घटनास्थळी जावून जावून गुन्हयातील आरोपीचा शोध घेणेकामी मार्गदर्शन केले. कक्ष २, गुन्हे शाखा, पनवेल** नेमणुकीतील पोह/१९३ रणजीत पाटील व पोशि/३२९० सम्राट डाकी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सोमटणे गांवातील रहिवासी नामे जयेंद्र जाना मुंढे, वय ३१ वर्षे यास सपोनि/शरद ढोले, सपोनि/संदीप गायकवाड, पोना/२७०० कुदळे, पोना/२०६८ म्हात्रे, पोना/ पाटील, व पथकाने ताब्यात घेवुन त्याचेकडे अधिक चौकशी केली असता, त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबूली दिल्याने त्यास पुढील कारवाई करीता पनवेल तालुका पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्हयाचे घटनास्थळावर कोणत्याही प्रकारचे सीसीटीव्ही उपलब्ध नसताना तसेच कोणताही दुवा हाती नसताना सदरचा गंभीर गुन्हा कौशल्याने उघडकीस आणुन आरोपीतास शिताफिने २४ तासाच्या आत अटक केली आहे.

अशा प्रकारे कौशल्याने खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

१) **कामोठे पोलीस ठाणे गुरजिनं. १३५/१९ एन.डी.पी.एस. का. १९८५ चे कलम ८(क) २०, २९**

२) **पनवेल शहर पोलीस ठाणे गुरजिनं ३०४/१९ भादवि कलम ३६३**

**३) पनवेल तालुका पोलीस ठाणे गुरजिनं १३२/१९ भादवि कलम ३०७**

- सदरची कामगिरी गुन्हे शाखा, कक्ष २, पनवेल वपोनि/के. आर. पोपेरे, सपोनि/जी.एस.कराड सपोनि/शरद ढोले, सपोनि/एस.एस.गायकवाड, पोह/सुनिल साळुंखे, संजिव पगारे, महेश चव्हाण, प्रमोद पाटील, पदमसिंग पवार, राकेश मोरे, सचिन पवार, रंजीत पाटील, पोना/सुनिल कुदळे, परेश म्हात्रे, विनोद पाटील, प्रफुल मोरे, पोकॉ/अभय सागळे, सम्राट डाकी, संजय पाटील, प्रविण भोपी, चालक पोना/सचिन पाटील, पोहवा/राजेश बैकर गुन्हे शाखा, कक्ष २, पनवेल यांनी केलेली आहे.

-----